सह महापालिका आयुक्त यांचे
घनकचरा व्यवस्थापन कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :- ०४/११/२०२०

**<u>प्रेस नोट</u>**

**<u>विषय :- पुणे महानगरपालिका व स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था यांचेमार्फत आयोजित फिरते व्ही- कलेक्ट मोहिमेबाबत.</u>**

दिवाळी म्हणजे भेटींची देवाणघेवाण करण्याचा तसेच स्वच्छता व आवराआवर करण्याचा मोसम. या वेळी आपण आपल्याला उपयोग नसलेल्या वस्तू टाकून देतो. पण अनेकदा या वस्तू अजूनही अनेक वर्षे वापरता येण्याजोग्या असतात. आणि आपल्याला प्रिय असलेल्या या वस्तूंचा जास्तीत जास्त उपयोग होण्याचा उत्तम मार्ग म्हणजे ज्यांना त्याचा वापर करता येणार असेल अशांना त्या देऊन टाकणे! एक उदाहरण म्हणजे, जेव्हा एखाद्या कपड्याचा वापर तुम्ही ९ महिन्यांनी वाढवता तेव्हा तुम्ही त्यामुळे होणारे कार्बन फुटप्रिंट ३०% ने कमी करत असता. म्हणजे अशा अनेक इतर वस्तूंचा जर आपण पुनःवापर किंवा पुनःचक्रीकरण केले तर पृथ्वीचे पर्यावरण वाचवण्यात आपण किती भर घालू शकतो याची कल्पना करा !!

अशाप्रकारे देणाऱ्यांना आणि घेणाऱ्यांना एकत्र आणण्यासाठी पुणे महानगरपालिका व स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मिळून व्ही-कलेक्ट अभियान राबवित आहे. अनेक टन माल लँडफील पर्यंत पोहोचण्यापासून वाचवणारा, तसेच उत्तम दर्जाच्या वस्तू एरवी ज्यांना परवडू शकणार नाहीत अशांपर्यंत त्या पोहोचवणारा व्ही-कलेक्ट हा उपक्रम गेल्या काही वर्षांपासून पुण्याच्या संस्कृतीचा एक भाग बनला आहे.

हे वर्ष अनेक आव्हाने घेऊन आले होते, त्यामुळे शारीरिक अंतर राखण्याचा तसेच प्रवास कमी करण्याचा व सुरक्षित राहण्याचा उपाय म्हणून "फिरते व्ही-कलेक्ट" या नव्या अवतारात हा उपक्रम आपल्यासमोर घेऊन येत आहोत. दि. ९ ते १३ नोव्हेंबर मध्ये व्ही - कलेक्ट चे चमू शहरभरात फिरून आणि ठिकठिकाणी विविध थांबे घेऊन नागरिकांना त्यांना नको असलेल्या वस्तू देऊन टाकण्यास मदत करणार आहेत.

"एकाला नको असलेली वस्तू अनेकदा दुसऱ्याला उपयोगी ठरू शकते, आणि कचऱ्याचा दिवसेंदिवस गंभीर होत चाललेला प्रश्न सोडविण्याकरिता आपल्याला जमेल तितके वस्तूंचे पुनःचक्रीकरण व पुनःवापर करून लँडफील वर जमणारे कचऱ्यांचे ढिगारे कमी केले पाहिजेत. गेली अनेक वर्षे कपड्यांसारख्या इतर वस्तू देखील गोळा करून पुणे महानगरपालिका व स्वच्छ त्यांचे पुनःचक्रीकरण करीत आहे. परंतु ही केंद्रे नेहमीच सर्वांना जवळ पडत नाहीत. म्हणूनच दिवाळी च्या काळात नागरिकांच्या सोयीकरिता "फिरते व्ही-कलेक्ट" सुरू करण्यात आले आहे. यामध्ये आपल्या घरातील नको असलेले कपडे, खेळणी, पुस्तके, इलेक्ट्रॉनिक

वस्तू, चप्पल, बूट या वस्तू स्विकारल्या जातील. नागरिकांनी गाद्या-उषा, थर्माकोल, बाथरूम फिटिंग्ज आणू नयेत अशी विनंती आहे.

तसेच महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना देखील अशाप्रकारचे घरातील नको असणारे साहित्य देण्याची सोय पुणे महानगरपालिका मुख्य इमारत याठिकाणी करण्यात आली आहे.

अधिक महितीकरीता स्मिता राजबली यांना - +९१ ७०६६० ३२९७२ येथे किंवा स्वच्छ च्या मदत क्रमांकास - +९१ ९७६५९ ९९५०० येथे संपर्क करावा.

कळावे.

(संजय गावडे)
सह महापालिका आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका